

# विदर्भातील प्रेरणादायी यशोगाथा

# दुधलम



DILASA

**दिलासा जनविकास प्रतिष्ठान**

बी-३, सुदर्शन पार्क, वेदांतनगर, एम.आय.डी.सी. विभागीय कार्यालयासमोर,
औरंगाबाद - ४३१ ००५. दूरध्वनी (०२४०) २३२०४४४.
ई-मेल : dilasango@gmail.com, संकेतस्थळ : www.dilasango.org

# विदर्भातील प्रेरणादायी यशोगाथा
# दुधलम

विदर्भातील प्रेरणादायी यशोगाथा
दुधलम

◆ पहिली आवृत्ती : ५ ऑगस्ट २०१३

◆ अंतर्गत सजावट व अक्षर जुळणी : रवि बोराडे

◆ मुखपृष्ठ : रवि बोराडे

◆ मुद्रक व प्रकाशक :
दिलासा जनविकास प्रतिष्ठान
बी-३, सुदर्शन पार्क, वेदांतनगर,
एम.आय.डी.सी. विभागीय कार्यालयासमोर,
औरंगाबाद - ४३१ ००५. ई-मेल : dilasango@gmail.com
संकेतस्थळ : www.dilasango.org
© दिलासा जनविकास प्रतिष्ठान, औरंगाबाद

# मनोगत



विदर्भातील अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ आणि वर्धा या सहा आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये विशेषतत्वाने नाबार्डने सर्वांगीण पाणलोट क्षेत्र विकास हा कार्यक्रम २००६ मध्ये हाती घेतला.अकोला जिल्ह्यातीलव अकोला तालुक्यातील दुधलम या छोट्याशा गावी नाबार्डने सर्वांगिण पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्याकरिता दिलासा जनविकास प्रतिष्ठान या स्वयंसेवी संस्थेची निवड केली. सुमारे चार वर्षे सक्रिय लोकसहभागातून सर्वांगीण पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम संस्थेने यशस्वीपणे पूर्ण केला.आणि आता पाणलोट विकास कार्यक्रमाचा वस्तुपाठ म्हणून दुधलम विदर्भात ओळखले जात आहे. या यशोगाथेचे खरे शिल्पकार आहेत दुधलमचे सर्व गावकरी, ग्रामपंचायत, गावातील अन्य संस्था, उत्साही महिला. या सर्वांच्याच सक्रिय सहभाग व सहकार्यातून हे सर्व घडू शकले. अर्थात नाबार्ड व अमरावती येथील उप महाप्रबंधक श्री. पी. एल. कुलकर्णी यांच्या मोलाच्या मार्गदर्शनामुळेच ही यशोगाथा साकारली. पाणलोट क्षेत्र विकासामध्ये गेली सतरा वर्षे सातत्याने व निष्ठापूर्वक कार्य करणाऱ्या आमच्या दिलासा जनविकास प्रतिष्ठान संस्थेने या सर्व कामात आपला खारीचा वाटा उचलला याचे आम्हाला समाधान वाटते.

या यशोगाथेची अतिशय मोजक्या शब्दांत फारशी आकडेवारी न देता सोप्या शब्दांतून माहिती देणारी ही छोटेखानी पुस्तिका या क्षेत्रातील कार्य करणाऱ्या सर्वांनाच उपयुक्त व प्रेरणादायी ठरेल असे वाटते.

**प्रा. डॉ. अनघा पाटील**

अध्यक्ष, दिलासा जनविकास प्रतिष्ठान



# विदर्भातील प्रेरणादायी यशोगाथा : दुधलम

अकोल्यापासून पूर्वेस ४५ कि.मी. अंतरावर अकोला तालुक्यातील दुधलम हे शेवटचे गाव. तीन हजार लोकसंख्येच्या या गावात प्रामुख्याने मराठा व भराडी समाजाची लोकवस्ती. दुधलमच्या पाणलोटामध्ये दुधलम, डाळिंबी व कोळंबी ही गावे आहेत. शेती हा मुख्य व्यवसाय असणाऱ्या या गावात खरिपातच एकूण पीक घेतले जायचे. त्यामध्ये सोयाबीन व कापूस या दोन पिकांचीच मोठ्या प्रमाणावर लागवड होत असे. गावात पाण्याची परिस्थिती तशी बिकटच असल्याने बागायती क्षेत्र अत्यंत कमी होते. पाण्याचा मुख्य स्त्रोत विहीर असल्याने बागायती क्षेत्रही फक्त गव्हापुरतेच मर्यादित होते. अल्पप्रमाणात म्हणजे सरासरी ७५० मिमी. पडणारा पाऊस आणि दोन पावसांमध्ये पडणारा खंड यामुळे या परिसरात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती.

कापूस व सोयाबीन या पिकांसाठी पूरक असलेले हवामान, काळी माती व इतर नैसर्गिक घटक मुबलक प्रमाणात असतानाही दरएकरी उत्पादन मात्र जेमतेमच व्हायचं. त्यामुळे शेतीवर अवलंबून असलेली अर्थव्यवस्था पूर्णतः कोलमडली. त्यातच खरिपाचे एकच पीक कसेबसे निघायचे. सोयाबीन आणि कपाशी निघाल्यानंतर शेतकरी आणि शेतमजुरांना गावात रोजगार मिळेनासा झाला. कामाच्या शोधात शहरी भागाकडे गावातून मोठ्या प्रमाणात स्थलांतर होऊ लागले. म्हणायला शासनाच्या योजना यायच्या अन् जायच्या पण गावाचा विकास पूर्णपणे थबकलेला होता.

शेतकऱ्यांना सावकाराचे कर्ज घेण्याशिवाय इतर पर्याय नव्हता. बेरोजगारी आणि कौटुंबिक समस्यांनी शेतकरी हतबल झाले. याच काळात अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्याही केल्या. मूलभूत गरजा भागत नसल्यामुळे ही सगळी दुर्दशा

झालेली होती. विदर्भातील शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्येविषयी प्रसार माध्यमातून येणाऱ्या बातम्या अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष वेधत होत्या. नाबार्डने सहा आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाची सुरुवात केली. जमिनीचा मगदूर सुधारणे, पाण्याचे पुनर्भरण व पीकरचना बदलासाठी पाणलोट क्षेत्राची उपचार पध्दती अनेक ठिकाणी परिणामकारक झाली होती. अकोला जिल्ह्यासाठी नाबार्डतर्फे दिलासा जनविकास संस्थान या स्वयंसेवी संस्थेची संसाधन संस्था म्हणून निवड करण्यात आली.

सन २००६ मध्ये नाबार्ड आणि दिलासा यांच्यातर्फे एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम दुधलम गावात हाती घेण्यात आला. एकंदर परिस्थितीने गांजलेल्या या गावातील लोकांनी संस्थेवर विश्वास टाकून धडाकेबाज पध्दतीने चार श्रमदान केले. त्यानंतर लोकसहभागातून पुढील कार्यक्रम आखण्यात आला. या पाणलोटाचे गटनिहाय नियोजन करण्यात आले. संपूर्ण प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला.







इथे काम करत असताना सर्वात पहिली अडचण आली ती म्हणजे लोकांची मानसिकता. गावकऱ्यांचे स्थलांतर, शेती करायची तर फक्त पारंपारिक पध्दतीनेच हाच ठोस समज, पिकेही घ्यायची ती पारंपरिकच, सिंचन पध्दतही वापरायची तीही जुनीच. या सर्व मानसिकतेमुळे त्यांचा शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोना व्यावहारिक नव्हताच पण हवामान बदलांमुळे झाड-जमीन व पाण्याचे नाते परत बांधण्याची गरज आहे हा विचारही कोणी केलेला नव्हता.

दिलासासमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे गावकऱ्यांचे स्थलांतर थांबविणे. शेतीमध्ये मिळकत नसल्याने पैसा कमावण्यासाठी लोक शहरी भागाकडे जात होते. मग पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत प्रथम बंधारे तयार करण्यासाठी श्रमदानाचे कार्य हाती घेतले. त्यामध्ये गावातील इच्छुक कुटुंबातून एक जण किंवा पती-पत्नी श्रमदानासाठी सहभागी होत होते. श्रमदानानंतर प्रत्यक्षात काम सुरू झाले. सकाळीच काम सुरू केले तर मोजमापाप्रमाणे हप्त्याला चांगला पैसा मिळू लागला. हप्त्याचा पगार वेळेवर मिळू लागला. आपल्या कष्टाचे, आपल्या हाताचे आपण मालक आहोत ही भावना वाढीस लागली. एका घरातून दोन व्यक्ती काम करत असल्याने गावातच चांगले आर्थिक उत्पन्न सुरू झाले. आर्थिक बाजू भक्कम झाल्यामुळे सर्वात पहिल्यांदा गावातील स्थलांतर थांबलं आणि ज्या लोकांनी सुरुवातीला श्रमदानासाठी विरोध केला, अविश्वास दाखवला, त्यांचीही मानसिकता ही बदलती स्थिती लक्षात घेऊन पालटली.

नाल्यातील बंधाऱ्यामुळे पाणी अडून राहू लागले. विहिरींची पाणी पातळी वाढली. पाणी गावात आल्यामुळे शेती व्यवसायाबरोबरच गावात स्वच्छता आणि एकदंर राहणीमान यामध्येही बदल घडू लागला. सुरुवातीला पूर्वी बांधलेल्या बंधाऱ्यांचीही दुरूस्ती करण्यात आली. त्यामध्ये डोंगराळ भागाच्या पायथ्याशी खोल जलशोषक चर वॅट (Water Absobtion Trench) व डोंगराळ भागाच्या वरच्या भागात सलग समपातळी चर सीसीटी (Continuous Contour Trench) खोदण्यात आले. या



सगळ्या कामाचा पाया श्रमदान असल्यामुळे त्यातूनच रोजगार मिळत गेला. बांधाने एक एक शेत बांधले गेले. एका बाजूला चांगली मिळकत आणि दुसऱ्या बाजूला माती अडविण्याचे, पाणी थांबविण्याचे काम सुरू झाले. गावातल्या शाळेतच जिथे मुले



पाठविण्यासाठी मागेपुढे पाहिले जायचे त्या गावकऱ्यांची मुले तालुक्याच्या ठिकाणी शिकण्यासाठी गेली. अन्न -वस्त्र - निवारा या मूलभूत गरजा भागून त्यांच्या घरात डिश टी.व्ही. सीडी प्लेअर, मोटारसायकल व हातात मोबाईल अशी साधने आली.



आता दुधलम गावातील काही निवडक यशोगाथा अतिशय थोडक्यात आपण पाहूया.

## डॉ. सतीश रामदास महल्ले : प्रगतिशील शेतकरी.

दुधलम गावातील हे एक सामान्य शेतकरी. आजच्या काळात शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोन तसा दुय्यमच आहे. ग्रामीण भागातील लोकांसाठी तर शहरी भागात जाऊन डॉक्टर, अभियंता होणं प्रतिष्ठेच समजलं जातं पण या सगळ्या गोष्टींना अपवाद ठरलेत सतीश महल्ले.

**डॉ.** सतीश महल्ले यांनी अकोला येथे आयुर्वेदात आपले पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. परंतु वडिलोपार्जित चालत आलेला शेती व्यवसाय करण्याची आवड त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. गावाकडे येऊन त्यांनी शेती करण्याचे ठरवले.



डॉ.सतीश यांच्याकडे सुमारे वीस एकर जमीन आहे. सुरुवातीला कुंटुंबाच्या वार्षिक धान्याची गरज पुर्ण होईल एवढच पीक यायचं यामुळे अन्नधान्याची गरज तर भागत होती. परंतु आर्थिक उत्पन्न मिळत नसल्याने आर्थिक परिस्थिती खूप हलाखीची होती. त्यात कुटुंबात एकूण पाच सदस्य त्यामुळे आर्थिक चणचण भासत असे.

पाणलोट क्षेत्र विकासामुळे भूजल पातळी वाढली. विहिरींना पाणी येऊ लागले. सांडपाण्याची सोय झाली. त्यामुळे स्वच्छता राहू लागली. ओघानेच आरोग्यही सुधारले. शेतीमधून आर्थिक उत्पन्न होऊ लागले. सुरुवातीला कुंटुंबापुरतेच असलेले धान्य आता बाजारपेठेत विक्रीसाठी उपलब्ध झाले. सध्या सतीश यांच्याकडील वीस एकर शेतीमध्ये सहा एकरावर गव्हाचे पीक घेतले असून त्याचे चौदा पंधरा क्विंटल एकरी उत्पादन मिळते. त्याचप्रमाणे बारा एकरावर हरभऱ्याचे पीक घेतले असून सात ते आठ क्विंटल एकरी उत्पादन मिळते. सोबतच त्यांनी सोयाबीनचे पीकही घेतले असून त्याचेही वार्षिक आठ ते दहा क्विंटल एकरी उत्पादन मिळते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सतीश यांनी आपल्या शेतीत स्प्रिंकलर पध्दतीने पिकांना पाणी देणे सुरू केले आहे.





आता एकूणच परिस्थिती बदलली स्वच्छता आरोग्य, शैक्षणिक स्तर आणि राहणीमान उंचावले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे उपजीविकेसाठी गावातून होणारं स्थलांतर थांबलं.सर्वांना रोजगार उपलब्ध झाला. संपूर्ण कुटुंब सक्षम बनलं. याचं एक उत्तम प्रेरणादायी उदाहरण म्हणजे डॉ.सतीश महल्ले होय.

## सौ.सुनीता अशोक महल्ले

यशस्वी दुग्धव्यावसायिक सौ. सुनीता अशोक महल्ले यांची यशोगाथा त्यांच्याच शब्दात ऐकूया.

'माझी आर्थिक परिस्थिती अतिशय हलाखीची होती. कुटुंबाच्या मुलभूत गरजाच भागवताना नाकीनऊ येत असे. गावात पाणी नसल्यामुळे रोजगार मिळत नव्हता. त्यामुळे दिवसेंदिवस परिस्थिती वाईटच होत चालली होती.



नाबार्ड व दिलासाने सुरू केलेल्या पाणलोट श्रेत्र विकास कार्यक्रमात आम्ही पती-पत्नी श्रमदानासाठी गेलो. या कामाची पंधरवडी आणि मासिक उचल मिळायची. त्यातच आम्ही दोघं काम करत असल्याने आमच्या दोघांची मिळून एकूण उचल बारा ते पंधरा हजार रु. मिळायचे. त्यामुळे आमचा घरखर्च चांगल्या प्रकारे भागून मागे शिल्लकही राहत असे.

हे काम संपल्यानंतर आम्ही गावातील सर्व महिलांनी एकत्र येऊन छोटासा व्यवसाय करण्याचे ठरविले. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमानंतर विहिरींची पाणी पातळी वाढली होती. शेतीला मुबलक पाणी मिळत होते. म्हणून पुरुष मंडळींचे शेतीकाम व्यवस्थित चालू होते. मग आम्ही महिलांनी आमच्या परीने सक्षम बनण्याचे ठरविले.

संस्थेच्या मार्गदर्शनाने बचत गटांची स्थापना केली. आमच्या गावात एकूण सहा बचत गट तयार झाले. प्रत्येक गटात दहा महिलांचा समावेश करण्यात आला. आमच्या बचतगटाची मी अध्यक्षा आहे. पुढे या गटांना प्रत्येकी एक म्हैस देण्यात आली. त्यानुसार सर्व गटांनी दुग्ध व्यवसाय सुरू केला. आजघडीला दरमहा हजार लिटर दूध निघते. हे दूध आम्ही मूर्तिजापूरच्या दूध डेअरीला पाठवितो. यामधून आम्हाला २५०० ते ३००० रुपये मासिक उत्पन्न मिळते. प्रत्येक गटाला प्रत्येकी एक म्हैस असा छोटा व्यवसाय आम्ही सुरू केला. परंतु आज आमच्या गटातील जवळपास सगळ्याच महिलांकडे स्वतंत्र्य दुभती जनावरे आहेत. आम्ही कुटुंबासाठी हातभार लावण्यासाठी सक्षम बनलो याचा आम्हाला आनंद अभिमान वाटतो.



पुढे बचत गटातील प्रत्येकी एक सदस्या घेऊन संयुक्त महिला समितीची स्थापना करण्यात आली.



या समितीअंतर्गत इच्छूक महिलांना घरगुती व्यवसायासाठी कर्ज देण्यात आले. त्यामध्ये मला पिठाची गिरणी घेण्यासाठी २८००० रुपये कर्ज मिळाले. त्यातून मी पिठाच्या गिरणीचा व्यवसाय सुरू केला व आज त्यातून मला दोनशे ते तीनशे रुपये महिना उत्पन्न मिळते.

एक गृहिणी स्वतःला सिद्ध करू शकली तेही वयाच्या चाळिशीनंतर आणि तेही कोणतेही पदवी शिक्षण नसताना, शहरी भागात न जाता याचा मला सार्थ अभिमान वाटतो. सुरुवातीला बँक ही संकल्पना आम्हा ग्रामीण स्त्रियांच्या फक्त ऐकण्यात होती. पण आज आम्ही स्वतः आमच्या व्यवसायातून झालेला नफा बँकेत जमा करतो. गरजेनुसार पैसे काढतो. असे व्यवहार आम्हाला आता येतात याबल आमच्यात विश्वास निर्माण करण्यासाठी आणि आम्हाला सक्षम बनवण्यासाठी मी 'दिलासा' व नाबार्डची शतशः ऋणी आहे.'

## सौ. वैशाली गणेश महल्ले : यशस्वी गृहउद्योजिका

संयुक्त महिला समितीची मी एक सदस्य आहे. समितीअंतर्गत मला स्वव्यवसाय थाटण्यासाठी पंचवीस हजार रुपयांचे कर्ज मिळाले. त्यातून मी शेवया तयार करण्याचे यंत्र घेतले. त्यानुसार आठ रुपये किलो या दराने मी शेवया बनविण्याचे काम घेते. यामधून मला सुमारे एक हजार ते दीड हजार रुपयांपर्यंत उन्हाळ्याच्या दिवसात मासिक उत्पन्न मिळते. माझ्या पतीचे आणि माझे उत्पन्न मिळून आज आमची आर्थिक परिस्थिती चांगली आहे ती फक्त दिलासा व नाबार्डमुळेच.

मला दोन मुलं आहेत. एक मुलगा तालुक्याच्या ठिकाणी शिकतोय तर दुसरा इथेच गावात आहे. त्यांच्या दोघांचीही शाळेची फी माझ्या कमाईतून मी भरते याचा मला खूप आनंद वाटतो.

दुधलम या विदर्भातील छोट्याशा गावाची ही यशोगाथा विदर्भातील अन्य गावांकरिता एक आदर्श वस्तुपाठ ठरावा इतकी यशस्वी आणि प्रेरणादायी ठरणारी आहे.